समाज परिवर्तनासाठी
नेतृत्व विकसन

# युवोन्मेष

सौर श्रावण शके १९४३

## ‘नेतृत्व’ विषयाला वाहिलेले युवागटासाठीचे प्रायोगिक अंक!

नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

राष्ट्रीय एकात्मता विशेषांक
भाग - २



# अंतरंग...

## भाग १, २, व ३ मधील सामायिक लेख


### भाग १

- **लेख**
  - ✻ हार्मनी अर्थात संवादिता!!
  - ✻ Gyansetu Visit to Jammu
- **QR Codes**
  - ✻ ब्रिगेडियर अभय भट यांचा संदेश
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Arunachal Pradesh)

**संवाद** ........................................ १

**हितगुज** .................................... ३

### भाग २

- **लेख**
  - ✻ National Integration A Citizen's Perspective........ ५
  - ✻ ज्ञानसेतूच्या माध्यमातून प्रवास करताना............. १०
- **QR Codes**
  - ✻ भारतीय लष्कर प्रमुख जनरल मनोज नरवणे यांचा संदेश.. ९
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Madhya Pradesh) ......................... १४

### भाग ३

- **लेख**
  - ✻ **Education - The Pathway to Leadership and National Integration**
  - ✻ ईशान्य भारतातील एक वर्ष...
- **QR Codes**
  - ✻ Video of Lt. Gen. S. S. Hasabnis (Retd.)
  - ✻ **Listen and Answer: Gyan Setu Katta** (Meghalaya)



तुमच्या प्रतिसादाच्या प्रतिक्षेत...
संपर्क – नेतृत्व संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी,
दूरभाष – ०२०-२४२०७१७९
yuvonmesh@gmail.com
WhatsApp No. – ९६३७३१७०६१



| संपादक | अतिथी संपादक | अक्षरजुळणी |
|---|---|---|
| महेन्द्र सेठिया | पूर्वा दीक्षित-धोकटे | सुप्रिया कुलकर्णी |

**प्रकाशन दिनांक**

**राष्ट्रीय सौर श्रावण-भाद्रपद शके १९४३/ऑगस्ट२०२१**

# संवाद

नमस्कार मित्र-मैत्रिणींनो,

युवोन्मेष च्या माध्यमातून तुमच्याशी बोलायची संधी मिळाल्याचा आनंद वाटतो आहे. युवोन्मेषचा हा राष्ट्रीय एकात्मता विशेषांक आहे आणि हा अंक भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने प्रकाशित होतो आहे याबद्दल विशेष आनंद वाटतो आहे!

स्वातंत्र्याच्या या अमृत महोत्सवी वर्षात आपण एका बाजूला आपल्या इतिहासाकडे बघून शिकायचे तर दुसरीकडे त्यातील चांगल्या-वाईट परंपरा समजून घेत भविष्याचा वेध घ्यायचा! या दोन्ही प्रक्रिया एकत्र करत असताना, 'आपण नक्की कोण? आपली संस्कृती, आपला समाज आणि त्यातल्या विचारधारा कोणत्या?' याचा शोध घेणे क्रमप्राप्त आहेच, पण त्यासोबतच आधुनिक जगतातील समाजरचना, विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगती, पर्यावरणीय बदल यांचा अभ्यासही आपल्याला करावा लागेल. या दोन्हीच्या अभ्यासातून पुढच्या काळात राष्ट्रीय एकात्मतेसाठी पूरक, पोषक घटक कोणते हे आपल्याला सापडेल. असे घटक शोधणे, त्यावर कामाला सुरुवात करणे आणि अशा कामासाठी गट उभा करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेसाठी नेतृत्व करणे.

अशा नेतृत्वाचे एक उदाहरण म्हणून ज्ञान प्रबोधिनी मध्ये २०१३ पासून ज्ञानसेतू हा प्रकल्प सुरू आहे. या प्रकल्पातून विज्ञानाचे माध्यम वापरून राष्ट्रीय एकात्मतेसाठी संपर्काचे काम नित्य चालू आहे. यातून आपण आत्तापर्यंत ८ राज्यांमध्ये ५५० कार्यकर्त्यांच्या मदतीने १०९० कार्यशाळांच्या माध्यमातून ५५००० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवीत आहोत.

त्यामुळेच या अंकाच्या संपादनाची जबाबदारी ज्ञानसेतूच्या गटाने घेतली. त्यातून ज्ञानसेतू गटाचे अनुभव, शिकलेल्या गोष्टी आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत.

ज्ञानसेतूच्या दौऱ्यांमध्ये सहभागी कार्यकर्त्यांचे अनुभव नक्की कसे होते, ते काय काय शिकले, त्यांनी या अनुभवांकडे कसे पाहिले या संदर्भातले प्रातिनिधिक लेख तुम्हाला या अंकांमध्ये वाचायला मिळणार आहेत आणि मला आशा आहे हे लेख वाचून, 'असे अनुभव आपण घेतले पाहिजेत' असे वाटेल. या सगळ्या कामामागची भूमिका समजून घेतली तर असे काम करण्याची प्रेरणा वाढत जाते असा माझा अनुभव आहे. मा. प्रशांत दिवेकर (भाग १ मध्ये) व मा. एअर वाईस मार्शल (निवृत्त) किरण पळसुले (भाग २ मध्ये) यांच्या लेखांमधून

सुद्धा भूमिका स्पष्ट व्हायला नक्की मदत होईल.

१०-१५ दिवस जाऊन कार्यशाळा घेतानाचे अविस्मरणीय अनुभव ठरवून वर्षभर मणिपूर सारख्या राज्यात जाऊन राहाणं तिथे काम करणं हा साहसी अनुभव देखील तुम्हाला वाचायला मिळेल.

राष्ट्रीय एकात्मतेविषयी प्रबोधिनीच्या भूमिकेतील काही पैलू या अंकातील विविध भागातील चौकटींमध्ये तुम्हाला वाचायला मिळतील, विचार करायला उद्युक्त करतील.

या अंकाचे अजून एक वैशिष्ट्य मला आवर्जून सांगावेसे वाटते ते म्हणजे तर लेखांबरोबर दिलेल्या लिंक्सच्या माध्यमातून ऐकण्यासाठी व पाहण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देत आहोत. ही मेजवानी आपल्याला मिळावी यासाठी हे आपलाच ज्ञानसेतूचा कार्यकर्ता आशुतोष भुजबळ याने विशेष प्रयत्न घेतले त्याचे मी आभार मानते.

गेलं वर्षभर चालू असणाऱ्या 'ज्ञानसेतू कट्टा' मालिके मधील "Know our country" या उपक्रमांमधल्या वेगवेगळ्या राज्यातील स्थानिक कार्यकर्त्यांच्या मुलाखती, तिथले प्रश्न, अनुभव समजून घेऊया. ते ऐकून त्याच्या खाली दिलेली प्रश्नावली नक्की सोडवा.

हा अंक एकूण तीन भागांमध्ये १५, २२ आणि २९ ऑगस्ट या तारखांना आपल्यापर्यंत पोहोचणार आहे. या 'युवोन्मेष'च्या अंक निर्मितीच्या प्रवासात माझा या विषयावर बराच अभ्यास झाला, चर्चा झाल्या. त्यासाठी मला सौगंधदादा आणि आशुतोषदादा बारमुख यांचे विशेष आभार मानावेसे वाटतात. या प्रयत्नाबद्दल तुमचे अभिप्राय आणि प्रतिक्रिया समजून घ्यायला नक्की आवडतील.

**तुमचीच,**
**पूर्वाताई**
(gyansetu@jnanaprabodhini.org)
९८८१७६१४८८

**ज्ञानसेतू या उपक्रमाबद्दल अधिक माहितीसाठी शेजारील लिंकवर क्लिक करा आणि व्हिडीओ पाहा.**

प्रिय युवा प्रबोधकांनो,

येत्या वर्षात 'युवोन्मेष'चे ५ अंक प्रकाशित करण्याचा संकल्प आपण केला आहे. त्यातील पहिला, 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांक' तुमच्यापर्यंत पोहोचवताना आनंद होत आहे. नेतृत्व संवर्धन केंद्रातील आजी-माजी विद्यार्थी व ज्ञान प्रबोधिनीच्या युवाशक्ती प्रबोधन कार्यदिशेतील युवक-युवतींचे गट यांच्या संयुक्त प्रयत्नातून यावर्षीचे अंक प्रकाशित होणार आहेत याचाही विशेष आनंद होतोय.

स्थानिक स्तरापासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर नेतृत्व करण्यासाठी समजून घेण्याचा, अनुभवण्याचा, विचार करून कृती करण्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे 'राष्ट्रीय एकात्मता' आहे असं मला वाटतं.

आपल्या देशाचा इतिहास, भूगोल, तेथील माणसं, त्यांची जीवनशैली, त्यांची संस्कृती, त्यांचे पिढीजात शहाणपण, त्यांचे प्रश्न यांचा परिचय करून घेणं, त्याविषयी आपल्या मनामध्ये आस्था निर्माण होणं, त्याविषयी आपलेपणा, आपुलकी वाटणं ही राष्ट्रीय एकात्मतेसाठीची पहिली पायरी आहे असं मला वाटतं.

त्यासाठी मातृभूमी परिचय सहली, देशाच्या विविध भागांमध्ये अभ्यास सहली व अभ्यासदौरे, मैत्री अभियाने, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्ये, ज्ञानसेतू सारखे प्रकल्प यांमध्ये सहभागी होणं, भारतातल्या विविध भागांमधील व्यक्तींशी संवाद-मैत्री वाढणं, तेथील लोकसंस्कृतीचा आस्वाद घेणं, तेथील भाषा समजून घेण्याचा, शिकण्याचा प्रयत्न करणं, तेथील कर्तृत्ववान व्यक्ती, संस्था, संघटना, चळवळी यांचा अभ्यास करणं इ. गोष्टी करता येतील. भारतामधील विविधतेतील एकता शोधण्यापेक्षा, एकतेची विविध रूपे कशी आहेत हे पाहात गेलो की अनेक गोष्टी आपल्याला, आपल्याशी जोडणाऱ्या वाटायला लागतील. त्यासाठी मुद्दाम वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत.

यापुढची पायरी अर्थातच एकात्मतेला पुष्टी देणाऱ्या व छेद देणाऱ्या घटकांचा अभ्यास करणं. त्यासाठी भारताच्या विविध भागातील प्राचीन व अर्वाचीन इतिहासापासून वर्तमानाचा व भविष्यकालीन इच्छा-आकांक्षा, स्वप्न-समस्या यांचाही अभ्यास करावा लागेल. त्यातून मोठ्या प्रमाणावर जनजागृती करावी लागेल. विविध विचारांमधील समान धागे जोडत जावं लागेल.

विविध प्रकारची विषमता ही या एकात्मतेला छेद देणारी महत्त्वाची गोष्ट आहे असं मला वाटतं. मग ती शिक्षणातली असो की संधींची असो किंवा रोजगाराशी, आर्थिक सुबत्तेशी निगडित असो किंवा भौतिक विकास, जीवनमान यांच्याशी संबंधित असो. ही विषमता समजून घेणं, त्यामागील कारणांचा अभ्यास करून ती दूर करण्यासाठी कृती कार्यक्रम योजणं, दीर्घकालीन-सातत्यपूर्ण, कल्पक संघटित प्रयत्नांची त्याला जोड देणं, असे प्रयत्न करणाऱ्या विविध संस्था-संघटनांमध्ये समन्वयाची भूमिका घेणं हेही आपल्याला करायला हवं आहे.

शिक्षण चालू असतानाच यासाठी ठरवून वेळ काढणं आणि शिक्षणानंतर काही महिने, वर्षं या कामासाठी वेळ देण्याचा संकल्प करणं अशी सुरुवात करता येईल. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये या प्रक्रियेला वेग यावा यासाठी युवोन्मेषचा हा 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांक' नक्कीच बळ देईल, विचारांना दिशा देईल आणि कृतीरूप प्रतिसाद देण्याची प्रेरणा देईल असा मला विश्वास वाटतो.

ज्ञानसेतू प्रकल्पाच्या प्रमुख पूर्वाताई, प्रकल्पातील कार्यकर्ता आशुतोष भुजबळ व नेतृत्व संवर्धन केंद्रातील सौगंधदादा यांच्या पुढाकारातून हा अंक साकार होतोय त्याबद्दल त्यांचे विशेष कौतुक! सर्व लेखकांना मनापासून धन्यवाद.

क्रमश: तीन टप्प्यात ई-माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहोचणाऱ्या युवोन्मेषेच्या 'राष्ट्रीय एकात्मता विशेषांका'चे तुम्ही डोळसपणे वाचन कराल व त्यावर विचार, कृतीतून प्रतिसाद द्याल असा विश्वास वाटतो.

'रूप पालटू देशाचे' या कार्यात आपण सगळेच सहभागी होऊ या! अनेकानेक शुभेच्छांसह....

**सस्नेह तुमचा,**

**महेन्द्र सेठिया**

# National Integration
# A Citizen's Perspective




**Mother India has been in existence as an entity for ages and shall remain. However, divisive forces have been relentlessly at work to fragmentise and weaken the nation. As conscientious citizens it's our duty to safeguard the unity and integrity of our nation in whichever way we can.**

When we as citizens, want to undertake the task, we need to consider the various dimensions of this issue. The concept of national integration includes political, economic, social, cultural and psychological dimensions and the interrelationships between them.

We are not well placed to address the political and economic dimensions. The remaining aspects, however, can be addressed through mass awareness and education.

Integration for a multilingual, multi-ethnic and multi religious country like ours, is not easy to attain. Integration without bulldozing through differences and without imposing only one ideology/ culture/religion is a challenge. Fortunately, the majority culture of this land is that

of acceptance and accommodation. Rejuvenating and nurturing that quality may be the need of the hour.

- **Objectives :** We need to break our task into smaller objectives. Put together, they should lead our efforts towards national integration. Further, we need to ensure that the objectives are explained in actionable terms. For example, instead of saying 'Develop a sense of fraternity', saying'Identify similarities among various groups' can make sense.
- **Reaching the Masses :** People cannot be coaxed into anything unless we communicate directly with them. If we wish to see progress in National Integration, we must reach the masses and we should do that with speed. This is not so hard in this age of communication. The technology needs to be exploited for educating the masses quickly.
- **Modalities of Integration :** Several activities and initiatives can contribute towards National Integration. As long as they are not at cross purposes, all of them can be activated simultaneously.
- **Reviving the bonds :** Identifying similarities among social groups can help in developing a sense of fraternity. Methodical research in this area can be undertaken to unearth hidden bonds and rejuvenate brotherhood.
- **Accessing and Presenting Authentic History :** The distortions, in our history books have resulted in ignorance as well as apathy about our heritage in the minds of young Indians. To rekindle the

pride and affinity towards the nation, it is necessary that the authentic version of our glorious past is known to every citizen. The revision of the school books can be left to the government, but we can write interesting story books/comics. We can reach the masses through multiple media. The options are many, but effective only if our work is perceived to be truthful, appealing and interesting.

- **Countering Divisive Narrative :** The success of our mission depends on the ability to produce positive content for the public that reshapes opinions, kindles a sense of pride, generates awareness towards social responsibilities and strengthens bonds.
- **Harnessing Mass Media :** Certain intellectuals seem to have exploited the mass media for decades shaping public opinions. We can emulate them to spread our word. We need to disseminate constructive content through the media to carry the message of integration. Some of the avenues that can be tapped are -
  - Hindi/regional film industry
  - TV



- Web based entertainment platforms
- Stage shows, Street plays
- Social media

• **Synergy Creation :** We are not the only ones in this crusade. Several organisations/individuals are undertaking good work throughout the country. We need to identify such agencies and align forces. Competition must be avoided and cooperation encouraged to infuse synergy in the project.

• **Drawing Inspiration from Ancient Literature :** The ancient literature has the potential for strengthening the cultural bonds, rejuvenating pride in our culture and purging ourselves of the misconceptions and distortions in our way of life. We need to work wisely to mine the treasure of our ancient literature and identify the elements that can help the process of national integration.

• **Cultural Reforms :** The openness, magnanimity and tolerance of Hindu culture has been one of the main factors that made India survive through centuries of oppression. However, distortions and malpractices have indeed crept in over time. (Casteism, untouchability etc. to name a few.) The fault lines so created are being exploited for widening divisions where none should be. Diligent efforts are required to purge everything that is undesirable from our society. This needs to be addressed at the grassroot level. The majority of Indians being innately religious, the reforms could be induced

through references to scriptures and traditions that they believe in.

• **Conclusion :** Many such modalities can be thought of, on which work can start independently, but in sync with other efforts. That the task of National Integration is gigantic cannot be overstated. It is necessary to break it down to measurable and attainable objectives. The main thing to understand is that we need to make progress on the ground in the foreseeable future. But let's not underrate our intellectual prowess and force of dedication. We need to collaborate with like minded people, expand the scope of work and increase the pace multifold. It is possible if energetic youth like you join hands. It is the need of the hour.

***

**- Air Vice Marshal KP Palsule (Retd)**
**kppalsule@gmail.com**



ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे माजी विद्यार्थी व भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल मनोज नरवणे यांचे मनोगत

# ज्ञानसेतूच्या माध्यमातून प्रवास करताना...



**"ज्ञानसेतू" हा ज्ञान प्रबोधिनी चा उपक्रम गेल्या ८ वर्षांपासून भारतातल्या दुर्गम भागात शिक्षणाचा प्रचार प्रसार करण्यात कार्यरत आहे. दर वर्षी काही युवक ह्या प्रांतात जाऊन, तेथील स्थानिक मुलांना शिकवतात आणि अविस्मरणीय अनुभव घेऊन येतात! असेच काही अनुभव नियाज मुलानी आणि निकिता सरोदे यांनी व्यक्त केले!**

नियाज व निकिता , दोघेही ४-५ वर्षांपासून ज्ञानसेतूशी जोडले गेले आहेत. नियाज हे B.Sc. Maths, M.Ed. (Tata Institute of Social Science) आहेत तर निकिता ह्यांनी B.Sc. (electronic science), M.Ed. (University of Hyderabad) ची पदवी प्राप्त केली. Fergusson college मध्ये Graduation करत असतानाच काही seniors कडून ज्ञानसेतू बद्दल माहिती मिळाली आणि नवा प्रवास सुरू झाला...

२०१७ साली, ९ प्रशिक्षित कार्यकर्त्यांचा चमू ज्ञानसेतू मार्फत सिक्कीम ला निघाला! काहींची महाराष्ट्राबाहेरची ही पहिलीच ट्रिप. त्यामुळे सगळेच प्रचंड उत्साहात होते. पण त्याचबरोबर होती ती जबाबदारी, सिक्कीमच्या विद्यार्थ्यांना हसत खेळत सखोल ज्ञान द्यायची. सहाजिकच, मनात जरा धाकधुक होती.



पण सिक्कीमच्या मनमिळावू लोकांमुळे ते सोप्प झालं. निकिता तिथल्या लक्षात राहील अशा अनुभवांबद्दल बोलतात, ''आम्ही जेव्हा मंगल, सिक्कीमला पोहोचलो तेव्हा एक व्यक्ती आम्हाला न्यायला आले आणि नंतर लक्षात आलं की ते तिथले जिल्हाधिकारी (collector) होते! इतके नम्र लोक आमच्या आजूनबाजूला होते. त्यामुळे एकूणच अनुभव छान राहिला. तिथल्या शाळांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून, त्यांचं राहणीमान समजून निकिता आणि नियाज यांनीही आपल्या शिकवणीतून तिथल्या मुलांना आपलंसं केलं! त्यानंतर आसाम (२०१८) आणि अरुणाचल प्रदेशात (२०१९) सुध्दा ते ह्याच उद्देशाने गेले. आसाम मधे घरासारखं मोकळं वातावरण त्यांना मिळालं. तिथलं राहणीमान, माणसं, अन्न महाराष्ट्रासारखं होत असं ते म्हणतात. तुलनेने अरुणाचलचा प्रवास जरा खडतर वाटला. थिनसा (Thinsa), म्यानमारला लागून आणि बांगलादेशच्या जवळ असलेलं हे गाव पूर्णपणे नवीन होत. काही कारणांमुळे तिथल्या व्यक्तींची भेट झाली नव्हती. संपूर्ण संपर्क फोन आणि इतर माध्यमातून करावा लागला. त्याउपर, राजनैतिक कारणांमुळे तिथे संचारबंदी लागू झाली होती. पण अशा परिस्थितीतही स्वतःहून मार्ग काढायला शिकलो आणि अविस्मरणीय अनुभवांमध्ये आणखी एक भर पडली! नियाज म्हणाले, "World begins where your thinking ends!" ही शिकवण मला ह्या प्रवासातून मिळाली''

शहरात आणि दुर्गम भागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधे काय फरक जाणवतो? ह्या प्रश्नाचे उत्तर देताना नियाज म्हणाले, ''मुलांमध्ये काहीच फरक नाही, फरक आहे तो पद्धतीत!''

सुरूवातीला कार्यशाळा घेताना ते रटाळ वाटले किंवा वर्गाचे तास लांबले तर मुले बोर व्हायची आणि प्रतिसाद मिळणं थांबायचं. पण हळूहळू शिकवण्याच्या पद्धतीत विद्यार्थ्यांचे मनोरंजन होईल असे बदल करण्यात आले. मुलांना बोलकं आणि comfortable करण्यासाठी वेगवेगळी गाणी, खेळ, नाच घेतले गेले. मुलं, विदयार्थी सगळीकडची सारखीच असतात आणि तिथल्या स्थानिक पद्धतीमुळे फरक जाणवतो.

निकिता, नियाज आणि इतर काही मंडळींनी मिळून एक संस्था सुरू करण्याचा विचार केला आणि वर्षभरातच ज्ञानसेतू, NSS आणि इतर काही कार्यशाळांच्या प्रेरणेतून Learnmate Foundation उदयास आली! १५ August, २०१९ ला Learnmate Foundation आणि ज्ञानसेतू यांचा एकत्रित उपक्रम सुरू झाला. आज ही संस्था विद्यार्थी युवकांच्या हातात आहे आणि मुख्यतः आरोग्य, पर्यावरण जनजागृती आणि शिक्षण या तीन सामाजिक घटकांवर कार्यरत आहे.

पदवी घेणाऱ्या विदयार्थ्यांना उद्देशून बोलताना यांचा भर learning outside the classrooms यावर होता. स्वत:ला जास्तीतजास्त explore करा, तुम्ही अजून काय



काय करू शकता याचा शोध घ्या हे ते बिंबवून सांगत होते.

सिक्कीम, अरुणाचल, आसाम आणि इतर ईशान्य भागातील मुलं शिक्षणात मागे पडण्याचं सर्वात मोठं कारण म्हणजे त्यांना स्वीकारल्या गेलं नाही. पुस्तकात असलेले धडे, उदाहरणे ते कधीच दैनंदिन जीवनाशी जोडू शकले नाहीत; कारण ते त्यांना आजूनबाजूला कधी दिसलेच नव्हते. ह्यामुळे शिक्षणाची गोडी कमी होत गेली. अरुणाचल प्रदेशात नव्याने काम सुरू करताना मुलांकडून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. कार्यकर्त्यांनी एक आठवडा काहीच न शिकवता फक्त मुलांचं आणि त्यांच्या परिसराच निरीक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्या काळात तिथली भाषा, काही शब्द आत्मसात केले. आणि पुन्हा त्यांच्या पद्धतीने शिकवणी सुरू झाली.

शेवटी ज्ञानसेतू चे असलेले महत्त्व एका वाक्यात सांगताना नियाज म्हणतात, "It revealed me the life. Told me what the life is! ‘‘राग, द्वेष, ह्या सगळ्या खूप छोट्या गोष्टी आहेत आणि ह्या पलीकडे एक मोठ्ठं जग आहे, हा विचार त्यांना ज्ञानसेतू ने दिला. निकिता यांच्यासाठी ज्ञानसेतू "opened up a path where we could travel and learn a lot !"

मुलाखतीचा शेवट करतांना , आम्हाला त्या दिवसांचा पुन्हा एकदा प्रवास करवून दिल्याबद्दल राहुल आणि सेजल ह्याचे त्यांनी आभार मानले.

***

**मुलाखतकार : राहुल वानखेडे, सेजल शिवरकर**
**शब्दांकन : सार्थता देशपांडे**

**आसाम मधील पार्वतीपूर येथील मुलांनी विविध भाषांमधली गायलेली गाणी व्हिडीओच्या माध्यमातून पाहायला शेजारी दिलेल्या लिंकवर क्लिक करा.**

## Listen and Answer

We are sharing a link to a video of **Gyan Setu Katta : Know Our Country Series.** Do watch this video and try to solve a quiz based on it. Let's see how much you know about the mentioned state!

State - Madhya Pradesh.

Here is an interview of

Mr. Digvijay Singh Chouhan (Chief Project Coordinator with Nimar Abhyudaya Rural Management And Development Association, (N.A.R.M.A.D.A.) Lepa Punarvas, hargaon district Madhya Pradesh) on Exploring Madhya Pradesh

Quiz Link

### सारे विचारप्रवाह आपलेच

एकाबाजूला व्यक्तीच्या घडणीला महत्त्वाचे समजणारा उदारमतवाद, तर दुसरीकडे त्याचा विरोध करुन वंचित, शोषित यांना समान प्रतिष्ठा मागणारा समाजवाद; अशा अनेक परस्पर विरोधी विचारांचा अभ्यास सामाजिक विषयांवर काम करताना करावा लागतो. विविध विचार प्रवाह प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे किंवा कळत-नकळत सामाजिक दुःस्थितीची जबाबदारी विरोधी विचारांच्या विशिष्ट वर्गावर टाकतात. त्यातून साहजिकच संघर्षाच्या ठिणग्या निर्माण होत राहतात. आजवर सामाजिक-आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी ज्यांना संधी मिळाली अशा समाजगटांनी आत्मसन्मान वाढवणाऱ्या संधी अन्य वंचित गटांना मिळवून देण्यासाठी सहकार्याची भूमिका ठेवायला हवी. स्वातंत्र्य, समता आणि न्याय यांच्याबरोबर बंधुता वाढवणे यासाठी 'सहनाववतु सहनौभुनक्तु - सहवीर्यं करवावहै' किंवा 'संगच्छध्वं संवदध्वं' अशाप्रकारची आध्यात्मिक भूमिका घ्यायला हवी.

स्वतःचे राष्ट्र हेच केंद्रस्थानी असावे अशी आग्रही भूमिका आज जगाच्या व्यासपीठावर सतत मांडली जात आहे. त्याचबरोबर निसर्गालाच महत्वाचा मानणारा सखोल पर्यावरणवाद विकसनशील देशाच्या विकासाच्या संधी हिरावून घेत नाही ना? असा प्रश्न निर्माण होतो. स्वतःच्या राष्ट्राची उन्नती करीत असतानाच विश्वबंधुत्वाची, पर्यावरणाच्या हिताची भूमिका भारतीय तत्त्वविचारात आलेली दिसते.

**- ज्ञान प्रबोधिनी साहित्यातून साभार**